मंत्री समितीची पुनर्रचना -
ऊस गळित हंगामाचा आढावा व धोरण ठरविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र.ससाका २०१६/प्र.क्र.१८७/२५ स
मंत्रालय, विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३.८.२०१६

वाचा :- १) शासन निर्णय कृषी व सहकार विभाग क्र.एफसीपी /१५८७/३६२/३ सी,दि.२ एप्रिल, १९८५.
२) शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.ससाका २०१०/प्र.क्र.२०३/२५ स, दि.७.८.२०१०.

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग दि. ७.८.२०१० नुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गतवर्षीच्या ऊस हंगामाचा आढावा व पुढील वर्षाच्या ऊस गाळप हंगामाबाबतचे धोरण ठरविण्यासाठी तसेच ऊसाचा अंतिम दर ठरविण्यासाठी मंत्री समिती गठित करण्यात आलेली आहे. विद्यमान सरकारच्या स्थापनेनंतर मंत्रीमंडळामध्ये " मा. उप मुख्यमंत्री " हे पद नसल्यामुळे मंत्री समितीमधून " मा. उप मुख्यमंत्री " हे सदस्य पद वगळणे तसेच नवीन मंत्रीमंडळामध्ये" मा.मंत्री (जलसंपदा) आणि मा. मंत्री ( लाभक्षेत्र विकास) " हे पद एकत्र केल्यामुळे मंत्री समितीमध्ये सदस्य म्हणून " मा.मंत्री ( जलसंपदा ) आणि मा. मंत्री ( लाभक्षेत्र विकास ) " ऐवजी सदस्य म्हणून " मा.मंत्री( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास ) " अशी मंत्री समितीच्या रचनेत सुधारणा करण्याची बाब आणि मंत्री समितीने दि. २४.९.२०१५ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार मंत्री समितीच्या कार्यकक्षेतून "सहकारी साखर कारखान्याचे अंतिम ऊसाचे दर ठरविणे " हा विषय वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय: -**

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गतवर्षीच्या ऊस हंगामाचा आढावा व पुढील वर्षाच्या ऊस गाळप हंगामाबाबतचे धोरण ठरविण्यासाठी तसेच ऊसाचा अंतिम दर ठरविण्यासाठी शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग दि. ७.८.२०१० नुसार गठित करण्यात आलेल्या मंत्री समितीच्या रचनेत सुधारणा करण्यात येत असून मंत्री समितीची सुधारित रचना आता खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २) | मा.मंत्री (सहकार) | सदस्य |
| ३) | मा.मंत्री ( वित्त ) | सदस्य |
| ४) | मा .मंत्री ( कृषी ) | सदस्य |
| ५) | मा.मंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास ) | सदस्य |
| ६) | मा.मंत्री (उद्योग ) | सदस्य |
| ७) | मा.राज्यमंत्री (सहकार ) | सदस्य |
| ८) | मा.राज्यमंत्री ( वित्त ) | सदस्य |
| ९) | अध्यक्ष/ उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई | निमंत्रित |
| १०) | अध्यक्ष/उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म., मुंबई | निमंत्रित |
| ११) | अप्पर मुख्य सचिव ( कृषी ) | निमंत्रित |
| १२) | प्रधान सचिव ( सहकार ) | निमंत्रित |
| १३) | प्रधान सचिव ( वित्त ) | निमंत्रित |
| १४) | प्रधान सचिव ( जलसंपदा ) | निमंत्रित |

१५) सचिव (लाभक्षेत्र विकास ) निमंत्रित

१६) व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादीत , मुंबई निमंत्रित

१७) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म.,मुंबई निमंत्रित

१८) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे आमंत्रक

२. सहकारी साखर कारखान्याचे ऊसाचे अंतिम दर ठरविण्यासाठी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली शासन अधिसूचना दि. २४.१२.२०१३ अन्वये ऊस नियंत्रण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच मंत्री समितीच्या कार्यकक्षेतून "सहकारी साखर कारखान्याचे अंतिम ऊसाचे दर ठरविणे हा विषय वगळण्यास तसेच अंतिम दराबाबत सर्व निर्णय ऊस नियंत्रण मंडळाने घेण्याबाबत मा. मंत्री समितीने दि. २४.९.२०१५ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यामुळे मंत्री समितीच्या कार्यकक्षेतून "सहकारी साखर कारखान्याचे अंतिम ऊसाचे दर ठरविणे" हा विषय वगळण्यात येत आहे. ऊसाच्या अंतिम दराबाबत सर्व निर्णय महाराष्ट्र ( कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या ) ऊस दराचे विनियमन अधिनियम २०१३ ह्या अधिनियमातील तरतुदीनुसार मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील ऊस नियंत्रण मंडळामार्फत घेण्यात येतील.

३. यापुढे मंत्री समिती "गतवर्षीच्या ऊस गाळप हंगामाचा आढावा व पुढील वर्षाच्या ऊस गाळप हंगामाबाबत धोरण निश्चित करेल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.सुदिन गायकवाड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत,

मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री ( वित्त ) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री ( कृषी ) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री ( जलसंपदा व लाभक्षेत्र विकास ) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (उद्योग ) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सहकार ) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री ( वित्त ) यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
मा. अध्यक्ष/ उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई
मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म., मुंबई
अप्पर मुख्य सचिव ( कृषी ), कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव ( सहकार ) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव ( वित्त ), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव ( जलसंपदा ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव ( लाभक्षेत्र विकास ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., मुंबई
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.मुंबई
साखर आयुक्त,आमंत्रक मंत्री समिती तसेच सदस्य सचिव उस नियंत्रण मंडळ ,महाराष्ट्र राज्य,साखर संकुल , शिवाजीनगर, पुणे
कार्यासन ३-स /२५ -स संग्रहार्थ